# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. झोपुप्रा/तां-२/अंभोप्र/मा.क्र.२०१/१५८०/२०२४
दि. २८/०६/२०२४.

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र (विक्री घटक विंग)

वाचा- १) प्रथम (मुळ) बांधकाम परवानगी क्र. ६९५ दि.१९/०४/२०१८
२) सुधारित बांधकाम परवानगी क्र. १०६० दि.१४/०९/२०२०.
३) सुधारित बांधकाम परवानगी क्र. २३४२ दि.३१/१२/२०२१.
४) सुधारित बांधकाम परवानगी क्र. ११५५ दि.१८/०८/२०२२.
५) सुधारित बांधकाम परवानगी क्र. १९१९ दि.१६/१०/२०२३.
६) सुधारित बांधकाम परवानगी क्र. १२७४ दि.१०/०५/२०२४.
७) योजनेचे आर्किटेक्ट यांचा भोगवटा मिळणेकामीचा दि.०३/०६/२०२४ रोजीचा प्रस्ताव
८) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि.१३/०६/२०२४.
९) अंशत: भोगवटा प्रमाणपत्र दि.०७/०३/२०२४ (पुनर्वसन विंग) व दि. १४/०३/२०२४ व (विक्री घटक विंग)

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ प्रमाणे मौजे शिवाजीनगर, भांबुर्डा फायनल प्लॉट.क्र.४८७/७,सि.स.नं. ११०८/७, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीस या प्राधिकरणामार्फत दि. १०/०५/२०२४ रोजी सुधारित बांधकाम परवानगी मंजूर करणेत आली आहे. तसेच विक्री घटक विंग G + १५ करिता विकसक यांनी जा.क्र. FB/४००० दि. २३/११/२०२३ रोजीची Part final fire NOC सादर केली आहे.

मंजूर बांधकाम परवानगीप्रमाणे विक्री घटक विंग इमारतीमधील ऑफिस क्र. ७०२ चे बांधकाम पूर्ण झाल्याचे योजनेच्या वास्तुविशारदांनी प्रमाणित केले असल्याने, प्राप्त प्रस्तावास अनुसरून फक्त ऑफिस क्र. ७०२ साठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

विक्री घटक इमारतीमधील भोगवटासाठीचा तपशील :-

| अ.क्र. | मजला | सुधारित, मंजूर बांधकाम नकाशानुसार विक्री घटक | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|
| | | Resi. | Comm. | |
| १) | सातवा | | ऑफिस क्र. ७०२ | ०१ ऑफिस |
| एकूण | | -- | ०१ ऑफिस | ०१ ऑफिस |

योजनेच्या इमारतीमधील ऑफिस क्र. ७०२ चे या बांधकामास आर्कीटेक्ट यांनी दिलेले बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व विकसकांनी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र व विहित नमुन्यातील हमीपत्राचे आधारे खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

## अटी व शर्ती

१) प्रस्तुत अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये वाढीव बांधकाम केल्याचे आढळून आल्यास,सदर बांधकाम अनधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार कारवाई करण्यात येईल.

२) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

३) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

४) इमारतीचे सर्व बाजूंनी असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) कायम खुले ठेवणे बंधनकारक आहे.

५) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

६) विकास योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्याने संबंधित पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करून तसे, अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मागणीपूर्वी, प्राधिकरणास अवगत करावे.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

७) अंशत: भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे चुकीची, खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात आढळून आल्यास दिलेले अंशत: भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

**सोबत-** भोगवटा नकाशा

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील
दि.१३/६/२०२४ रोजीचे मान्यतेने

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

**सहायक संचालक नगररचना**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे.

प्रत :- १) विकसक मे. नाईकनवरे बिल्डकॉन प्रा. लि. १२०४/४, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे -४२.
२) आर्कि. जी. एच. नाईकनवरे १२०४/४, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे -४२.
३) तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव.
४) संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना प्रत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.